# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १९८ वा शुक्रवार दि.२४ जानेवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







## महाराष्ट्रात मोठी गुंतवणूक येणार रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार : मुख्यमंत्री



मुंबई : प्रतिनिधी-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत राज्य सरकारने ६१ सामंजस्य करार केले आहेत. या करारांच्या माध्यमातून १५.७० लाख कोटी गुंतवणूक महाराष्ट्रात येणार असून, तब्बल १६ लाख रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. यामध्ये हरित ऊर्जा, ग्रीन हायड्रोजन, डेटा सेंटर शिक्षण, वित्त, आटोमोबाइल, मीडिया, मेटल, हेवी इंडस्ट्रिज याचा समावेश असून या माध्यमातून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार आहेत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. ते दावोसमधून बोलत होते.

राज्यात मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार आहेत. एमएमआरमध्ये असेल, विदर्भात ५ लाख कोटींचे एमओयू आले आहेत. मराठवाडा शक्तिस्थळ म्हणून उदयास येत आहे. ९८ टक्के ग्रोथ एफडीआय स्वरूपात आहे. या गुंतवणुकीमुळे मोठी रोजगार निर्मिती होईल. सर्वाधिक करार करण्यात आपण पहिल्या क्रमांकावर आहे. दावोस दौ-यात वेगवेगळ्या टेक्नॉलॉजी शिकायला मिळाल्या. महाराष्ट्राची शक्ती काय आहे, ती मांडण्याची संधी मिळाली. तसेच वेगवेगळ्या देशातील प्रतिनिधींसोबत संवाद साधला. भारत म्हणून आम्हाला आमची भूमिका मांडता आली. राज्याच्या दृष्टीने सकारात्मक चर्चा करता आल्या, असेही फडणवीसांनी सांगितले.

दावोसमध्ये झालेल्या करारात देश-विदेशी गुंतवणुकीमुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

दावोसमध्ये एकाच विदेशी कंपनीशी करार महाराष्ट्र सरकारने दावोस येथे ज्या कंपन्यांसोबत गुंतवणुकीसाठी सामंजस्य करार केले. यातील एक कंपनी परदेशातील असून उर्वरित २८ कंपन्या भारतीय आहेत. २८ पैकी २० कंपन्या महाराष्ट्रातील असताना गुंतवणुकीचे सामंजस्य करार दावोसला करण्याची गरज काय, असा सवाल करत विरोधी पक्षाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दावोस दौ-यावर टीकास्त्र सोडले आहे. दावोसमध्ये महाराष्ट्रासाठी विक्रमी गुंतवणुकीचे सामंजस्य करार झाल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे. मात्र, या दाव्यावर शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी टीका केली.

## लातूर शहर महानगरपालिकेतील बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष) पदभरतीतील अनियमिततेबाबत गंभीर आरोप

लातूर शहर महानगरपालिकेने 'राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (छ्णक्च्)' आणि '१५व्या वित्त आयोग' अंतर्गत बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष) पदांसाठी कंत्राटी तत्वावर भरतीसाठी १२ जानेवारी २०२४ रोजी जाहिरात प्रसिद्ध केली होती. या भरती प्रक्रियेत ११३ पात्र उमेदवारांची यादी प्रकाशित केली गेली होती. मात्र, ८ जानेवारी २०२५ रोजी प्रकाशित झालेल्या अंतिम निवड यादीत (संदर्भ क्र. जाक्र/लाशमनपा/आरोग्य विभाग/५१५/२०२४-२५) आरक्षण धोरणांचे स्पष्ट उल्लंघन झाल्याचा आरोप दिव्यांग्जन सेट नेट पीएच डी धारक संघ महाराष्ट्र राज्य यांजकडून करण्यात आला आहे.

प्रमुख मुद्दे:

१. खुल्या प्रवर्गातील आरक्षण नियमांचे उल्लंघन:अंतिम निवड प्रक्रियेत मागासवर्गीय (ओबीसी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, एनटी) उच्च गुणवत्तेच्या उमेदवारांना डावलले गेले आहे.

२. आरक्षण धोरणांचे पालन न करणे: निवड समितीने आरक्षण धोरणांमध्ये मनमानी केली असून, विविध पार्श्वभूमीतील उमेदवारांना अन्यायकारकपणे वगळले आहे.

३. भ्रष्टाचार आणि पक्षपातीपणाचा संशय: निवड प्रक्रियेत एका पदासाठी अनेक जातीतील उमेदवार निवडले गेल्याचा आरोप असून, यामागे भ्रष्टाचार आणि पक्षपातीपणा असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

प्रमुख मागण्या:

भरती प्रक्रियेची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ बडतर्फीची कारवाई करावी.

अयोग्य निवडलेल्या यादी रद्द करून, गुणवत्तेनुसार आणि आरक्षण धोरणांचे पालन करून सुधारित यादी प्रकाशित करावी.

सदरील प्रकरणाची सखोल चौकशी करून चुकीच्या पद्धतीने आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करणाऱ्या निवड समितीतील अध्यक्ष, सदस्य किंवा इतर जबाबदार अधिकाऱ्यांना शासनाच्या नियमाप्रमाणे बडतर्फ करून योग्य त्या पात्र उमेदवारांना लवकरात लवकर न्याय मिळवून द्यावा.


जर योग्य ती कारवाई करण्यात आली नाही, तर राज्य आरोग्य संचालनालयासमोर संविधानिक मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संघटनेने आपल्या पत्रात दिला आहे.

सदर प्रकरणाच्या अनियमिततेबाबतची सविस्तर माहिती आणि निवेदन आज दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११:१५ वाजता महाराष्ट्र राज्याचे माननीय राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, तसेच सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाचे मंत्री यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांना ईमेलद्वारे पाठविण्यात आली आहे.

## भारतीय संविधान अमृत महोत्सवानिमित्त २६ जानेवारी रोजी 'हर घर संविधान' उपक्रम

लातूर:-भारतीय संविधान अमृत महोत्सवानिमित्त 'हर घर संविधान' उपक्रम सामाजिक न्याय विभागाच्यावतीने राज्यात राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत २६ जानेवारी अर्थात प्रजासत्ताक दिनी विविध कार्यक्रमांचे आयोजन करून संविधानाचा जागर केला जाणार आहे. यामध्ये जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे.

भारतीय राज्यघटनेबाबत जागरूकता, तसेच संविधानाची मूल्ये शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्यापर्यंत पोहोचावीत, यासाठी राज्यातील शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संकुले तसेच ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्था अशा सर्व ठिकाणी 'हर घर संविधान' उपक्रम आयोजित करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत शाळा, महाविद्यालयांमध्ये विविध स्पर्धा, व्याख्यान, दौड, रॅली व संविधान जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करावे. तसेच जिल्ह्याच्या ठिकाणी




भारतीय संविधानाबद्दल माहिती देणारे कार्यक्रम व संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाटप केले जाणार आहे. प्रजासत्ताक दिनी संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करण्यात येणार आहे. त्यानुसार सर्व आस्थापनांमध्ये, शाळा व महाविद्यालय, तसेच ग्रामपंचायतींमध्ये संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करण्यात यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये २६ जानेवारी रोजी होणाऱ्या ग्रामसभेत तसेच जिल्ह्यातील सर्व कार्यालये, शाळा, महाविद्यालयात संविधानाचे महत्व सांगून संविधान प्रस्ताविकेचे वाचन करावे. तसेच सर्व शाळा, महाविद्यालये, वसतिगृह, शैक्षणिक संस्थामध्ये प्रजासत्ताक दिनी संविधानाचे महत्व या विषयावर व्याख्यान, दौड व इतर स्पर्धांचे आयोजन करून प्रस्ताविकेचे वाचन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जिल्ह्यात २५ जानेवारी रोजी महिला विशेष ग्रामसभेचे आयोजन

लातूर, दि. २३ : जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये २५ जानेवारी २०२५ रोजी महिला विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमानुसार २६ जानेवारी रोजी होणाऱ्या ग्रामसभेपूर्वी ही महिला विशेष ग्रामसभा होणार आहे.

महिला विशेष ग्रामसभेमध्ये लक्ष्मी मुक्ती योजनेंतर्गत सातबारावर सहधारक म्हणून महिलेचे नाव लावणे, महिलांसाठी असलेल्या विविध विभागांच्या योजनांची माहिती देणे व अर्ज भरून घेणे, महिला केंद्रित 'आई' पर्यटन धोरण राबविणे, ग्रामीण भागातील घरांची नोंदणी पती-पत्नी यांच्या संयुक्त नावे करणे, गावातील विधवा तथा एकल महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देणे आदी विषयांवर चर्चा होईल. तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाबाबत माहिती देण्यात येणार आहे. तसेच बालविवाह रोखण्याबाबत प्रतिज्ञा घेवून विविध उपक्रम राबविण्याचे नियोजन करणे, ग्रामस्तरावर बालसंरक्षण समितीची स्थापना करण्याबाबत या ग्रामसभेत चर्चा केली जाणार आहे, असे जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ यांनी दिली.

**शंभर दिवसांचा सात कलमी कार्यक्रम**

## जिल्ह्यात गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचा उद्योजकांशी संवाद

लातूर, दि. २३ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना शंभर दिवसांच्या कृती आराखड्यात दिलेल्या सात कलमी कार्यक्रमानुसार जिल्ह्यात गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत प्रयत्न केले जात आहेत. या अनुषंगाने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात उद्योजकांशी संवाद साधला. उद्योजकांना आवश्यक परवानग्या, तसेच विविध सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

उपजिल्हाधिकारी तथा जिल्ह्यातील गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन देण्यासाठी नियुक्त नोडल अधिकारी संगीता टकले, महाराष्ट्र आद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी अमित भामरे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रवीण खडके यांच्यासह जिल्ह्यातील उद्योजकांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.उद्योजकांना येणाऱ्या अडचणी जाणून घेवून त्यावर कार्यवाही करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने उद्योजकांशी सातत्याने संवाद साधण्याचा उपक्रम सुरु केला आहे. उपजिल्हाधिकारी संगीता टकले या उपक्रमाच्या नोडल अधिकारी आहेत. उद्योगासाठी आवश्यक विविध परवाने, वीज, रस्ते यासारख्या मुलभूत सुविधा सुलभ पद्धतीने उपलब्ध होण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. तसेच एमआयडीसी क्षेत्रातील सुविधांचे सक्षमीकरण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यावेळी म्हणाल्या.

उद्योगांसाठी आवश्यक परवाने घेण्यासाठी कोणकोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, याचे फलक सर्व संबंधित कार्यालयांमध्ये दर्शनी भागात लावावेत. हे परवाने देताना विलंब होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी संबंधित प्रशासकीय विभागांना दिल्या.

## भारताचा वैभवशाली इतिहास तरुणांनी जपला पाहिजे.

लातूर / प्रतिनिधी :-संपूर्ण विश्वामध्ये भारताने आपली संस्कृतीची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे भारताचा वैभवशाली इतिहास महाविद्यालयीन तरुणांनी जपला पाहिजे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवी आणि वक्ते भारत सातपुते यांनी केले. महात्मा बसवेश्वर कला, वाणिज्य, विज्ञान आणि व्यवसाय अभ्यासक्रम महाविद्यालय, लातूर द्वारा निरोप समारंभ आणि विविध गुणदर्शन कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी विचारमंचावर अध्यक्षस्थानी श्री महात्मा बसेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, प्रमुख अतिथी म्हणून शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ संचालक राजेश्वर बुके, प्रा. जी. एम. धाराशिवे, प्राचार्य डॉ. संजय गवई,





मुख्य समन्वयक डॉ. भास्कर रेड्डी नल्ला, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले आणि संगीत विभागाने स्वागत गीत सादर केले. पुढे बोलताना भारत सातपुते म्हणाले की, आजच्या तरुणांनी लोकशाहीचे रक्षण केले पाहिजे. लोकशाही नावाची व्यवस्था महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात पाहावयास मिळते. माणसाने माणसाशी माणसासम वागले पाहिजे हे कृतीत उतरविणारे हे महाविद्यालय आहे. विदयार्थ्यांनी आपल्या भावी आयुष्यात उत्तरोत्तर प्रगती करावी ही प्रगती करत असताना आपल्या आई वडिलांच्या कष्टाचे स्मरण ठेवावे. मातेच्या वात्सल्यपूर्ण कवितेतून त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रास्ताविकपर मनोगतात प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, सन १९७० पासून महात्मा बसवेश्वर महाविद्यालय कला, वाणिज्य, विज्ञान, व्यावसायिक अभ्यासक्रम, समाजकार्य, संगणकशास्त्र या विषयामध्ये निकालाची उज्ज्वल परंपरा निर्माण केली. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुनाणा वाव मिळवा म्हणून वार्षिक स्नेह संमेलनाचे आयोजन केले होते असे सांगून विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी आणि भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी जेष्ठ संचालक प्रा. जी. एम. धाराशिवे म्हणाले की, विद्यार्थ्यानी आपल्या महाविद्यालयीन जीवनामध्ये आपल्या आई वडीलासोबत आपल्या गुरुजणांचाही आदर केला पाहिजे असे सांगून इयता १२वीच्या विद्यार्थ्याना फेब./मार्च २०२५ परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोपात करताना आदिनाथ सांगवे म्हणाले की, भारताच्या उज्वल भविष्यासाठी आजची तरूण पिढी सक्षम झाली पाहिजे. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच कला कौशल्यांचा विकास साधला पाहिजे, असे सांगून आपल्या महाविद्यालयाती पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला पाहिजे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी कॉपी मुक्त अभियाना अंतर्गत शपथ वाचन प्रा. वनिता पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांनी केले तर आभार प्रा. रवींद्र सोनोने यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. अश्विनी रोडे आणि प्रा. किसनाथ कुडके यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा विश्वनाथ स्वामी, प्रा. रवींद्र सोनोणे, प्रा. वैशाली जयशेटे, प्रा. शैलेश कानडे, प्रा. गुणवंत बिराजदार, प्रा. व्यंकट दुडिले, प्रा. नारायण गोरे, प्रा. रवींद्र सुरवसे, प्रा. कल्पना गिराम, प्रा. जयश्री पाटील, प्रा. रोहिणी शेटकार आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# साखर उत्पादनात भारत अव्वल

जागतिक साखर उत्पादनात ब्राझिलनंतर भारत दुसर्या क्रमांकावर आहे. २००५-०६ पासून विचार केल्यास देशातील उसाचे क्षेत्र कायम ४० लाख हेक्टरपेक्षा अधिक राहिले आहे. मागील काही वर्षांत तर ते ५० लाख हेक्टरपेक्षा अधिक होते. पाण्याची उपलब्धता समाधानकारक असेल, तर उसाचे उत्पादन भरघोस येते. पाणी, वीज व अन्य अडचणी असल्यास उसाचे क्षेत्र व साखरेच्या उत्पादनात घट होते. देशातील साखर उद्योगात महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, गुजरात, तामिळनाडू व कर्नाटक ही राज्ये आघाडीवर आहेत. जागतिक उत्पादनाच्या सुमारे १३ टक्के साखरेचे उत्पादन भारतात होत असले, तरी निर्यातीत मात्र भारत चौथ्या क्रमांकावर आहे. भारतातून म्यानमार, सोमालिया, सुदान, संयुक्त अरब अमिरात, पाकिस्तान, सौदी अरेबिया, श्रीलंका आणि टांझानिया आदी देशांत साखरेची निर्यात केली जाते. देशातील हा उद्योग सध्या अडचणीत असून त्याच्याकडे साखरेचे साठे पडून आहेत. ते कमी होण्यासाठी साखरेची निर्यात होणे आवश्यक होते. गेली दोन वर्षे देशातील सहकारी व खासगी उद्योगांच्या संघटना वारंवार निर्यातीसाठी परवानगी देण्याची मागणी करत होत्या.

आता नुकतेच केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा विभागाने १० लाख टन साखर निर्यात करण्यासाठी हिरवा कंदील दाखवल्यामुळे या उद्योगास काहीसा दिलासा मिळाला. यामध्ये महाराष्ट्राला सर्वाधिक ३ लाख ७४ हजार, तर उत्तर प्रदेशला १ लाख टनांचा कोटा मिळाला. या निर्णयामुळे देशातील साखर साठा कमी होऊन, पर्यायाने बाजारपेठेतील साखरेचे दर वाढतील. आंतरराष्ट्रीय बाजारातील चढ्या दराचा फायदा मिळणे तसेच शेतकर्यांची ऊस बिले देण्यासाठी पैसे उपलब्ध होणे, असे फायदे या उद्योगास होणार आहेत. साखरेचे भाव जरा जरी वाढले, तरी मध्यमवर्गाचे काय होणार, गृहिणींचे हाल होणार अशा बातम्या येत असतात; पण साखरेचे भाव नरम असल्यास त्याचा कारखान्यांच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होतोच. लाखो ऊस शेतकर्यांनाही तडाखा बसतो. केवळ शहरी मध्यमवर्गीयांचा विचार करणार्यांनी आज शेतकर्यांची स्थिती काय आहे, याकडेही पाहिले पाहिजे. आता केंद्राच्या या निर्णयामुळे कारखान्यांवरील कर्जाचा व व्याजाचा बोजा हलका करणे शक्य होईल. उसाची थकबाकीही घटेल. २०२१-२२ मध्ये ११० लाख टन, तर २०२२-२४ या काळात केवळ ६० लाख टन साखर निर्यात करण्यात आली. मागील हंगामात तर साखर निर्यातीस परवानगीच नव्हती. आता निर्यातीनंतरही चालू हंगामात देशांतर्गत वापरासाठी पुरेसा साखरेचा साठा शिल्लक राहील, तसेच इथेनॉलचे उत्पादनही सुरळीत ठेवणे शक्य होईल. कारखान्यांकडे दैनंदिन व्यवहार करण्यासाठी 'लिक्विडिटी' आवश्यक असते. निर्यातीमुळे तीही राहू शकेल.

जागतिक बाजारातील साखरेचे दर भारतापेक्षा क्विंटलमागे ३०० रुपयांनी जास्त आहेत. त्यामुळे वाहतूक खर्च वगळता देशातील कारखान्यांना साखर निर्यातीतून क्विंटलमागे ४ हजार रुपयांचा दर मिळण्याची शक्यता आहे. २०२३-२४ मधील शिल्लक साखर ५७ लाख टन होती. २० लाख टन इथेनॉलसाठी वर्ग होणारी साखर सोडून ३१० ते ३२० टन साखर उत्पादनाचा तेव्हा अंदाज होता. शिल्लक साखरेसह एकूण उपलब्धता ३६७ ते ३७७ लाख टन अपेक्षित होती. देशात २७५ ते २८० लाख टन साखर लागते. म्हणजे सुमारे ९० ते १०० लाख टन साखर शिल्लक राहणार. त्यावेळी पुरेशी साखरनिर्मिती होणार असल्याने स्थगित केलेली उसाचा रस, सिरप व बी हेवी मोलॅसिस वापरून करायची इथेनॉलनिर्मिती पूर्वीप्रमाणे सुरू करण्याबाबतचा निर्णय होणे अपेक्षित होते; पण त्याचा विचार झाला नव्हता.

कारखान्यांनी इथेनॉल ब्लेंडिंग कार्यक्रमाच्या आधाराने प्रचंड भांडवल गुंतवणूक करून प्रकल्प उभे केले आहेत. त्यांचे हप्ते व व्याज भरणे कारखान्यांना अडचणीचे झाले होते शिवाय इथेनॉल निर्मितीतून मिळणारे उत्पादन विचारात घेऊन, कारखान्यांनी एफआरपीपेक्षा जादा उसाचे दर जाहीर केले. त्याची पूर्तता करणे अडचणीचे होणार असल्याची तक्रार कारखान्यांनी केंद्रापुढे मांडली होती. अखेर ६ डिसेंबर २०२३ रोजी इथेनॉलनिर्मितीवर जी बंदी घालण्यात आली होती, ती राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या प्रयत्नामुळे. केंद्र सरकारने २४ एप्रिल २०२४ रोजी अध्यादेश काढून ती उठवली; पण दरम्यानच्या काळात कारखाने अडचणीत आले होतेच. नव्या अध्यादेशानुसार, कारखान्यांना इथेनॉलनिर्मितीसाठी साडेसात लाख टन बी हेवी मोलॅसिसचा वापर करण्याची परवानगी देण्यात आली. यामधून सव्वातीन लाख टन अतिरिक्त साखर इथेनॉलनिर्मितीकडे वळवली गेल्याने त्यातून ३८ कोटी लिटर इथेनॉलनिर्मिती होऊन, या उद्योगाला २,३०० कोटी रुपये मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. या निर्णयामुळे साखरेचे साठे कमी होऊन, स्थानिक साखरेचे विक्री दर सुधारण्यास मदत झाली.

साखर उद्योगाशी संबंधित साखर नियंत्रण कायदा १९६६ आणि साखर दर कायदा २०१८ यांचे एकत्रीकरण करून, नवीन साखर नियंत्रण कायदा तयार करण्याचा प्रस्ताव केंद्रीय अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने दिला आहे; पण उद्योगावर नियंत्रण आणणार्या यातील तरतुदींमुळे हा उद्योग तसेच शेतकर्यांवर विपरीत परिणाम होईल, अशी भीती साखर कारखाना महासंघाने पूर्वीच व्यक्त केली आहे. उसापासून तयार होणार्या अन्य पदार्थांना प्रस्तावित कायद्यानुसार 'मुख्य दर्जा' मिळाल्यास ते उद्योगासाठी अडचणीचे ठरणार आहे. तसेच सर्व उत्पन्न हे कारखान्याचे आहे, असे गृहित धरल्यास शेतकर्यांना दर देताना अडचण निर्माण होईल. तसेच 'एफआरपी'मध्ये दरवर्षी वाढ होऊनही साखरेच्या किमान विक्री दरात पाच वर्षांत वाढ झालेली नाही. साखरेचे १० वर्षांचे सर्वंकष धोरण आखावे, ही कारखानदारांची मागणी आहे. त्यावर वेळीच विचार होणे गरजेचे. एकूण शेतकरी, कारखानदार आणि ग्राहक यांच्या हिताचा संतुलित विचार करून केंद्राने पुढील पावले टाकली पाहिजेत.

# सुंदर साधवी



प्रयागराजच्या त्रिवेणी संगमावर सध्या महाकुंभमेळा भरला आहे आणि विविध आखाड्यांच्या साधूंसह देश-विदेशातील हजारो भाविक तिथे आले आहेत. कुंभमेळ्याच्या पर्वकाळात तीन पुण्यसलिला नद्यांमध्ये स्नान केल्याने पापक्षालन व पुण्यवृद्धी होते असे मानले जाते; मात्र तिथे येणारे सगळेच लोक अशा पारमार्थिक लाभासाठी येतात असे नाही. कोणत्याही यात्रा-जत्रांमध्ये हौशे-नवशेही असतात, तसेच या मेळ्यातही हौशे-नवशे व तद्दन व्यावसायिक हेतूसाठीही येणारे अनेक असतात. अशाच एका माणसाने तिथे रुद्राक्ष माळा विकणार्या षोडशवर्षीय मुलीचा व्हिडीओ बनवला आणि तो व्हायरल झाला. मोनालिसा भोसले नावाची सावळ्या वर्णाची ही चंचल, भोळीभाबडी मुलगी तिच्या टपोर्या, पिवळसर-तपकिरी डोळ्यांमुळे आणि सुंदर हास्यामुळे अतिशय मोहक दिसते. तिचे हे व्हिडीओ पाहून कुंभमेळ्यात अनेक लोक पाप धुण्यासाठी नव्हे, तर हात धुवून तिच्या मागे लागून आणि तिच्यासमवेत रील्स बनवून स्वतःचे उखळ पांढरे करून घेण्यासाठी येऊ लागले. त्यामुळे आता या गरीब मुलीला तिथे पोटापाण्यासाठी माळा विकण्याचा व्यवसाय करणेही कठीण होऊन बसले आहे.

मोनालिसा ही मध्य प्रदेशातील महेश्वर या नर्मदाकाठी असलेल्या नगरीतील भटक्या समाजाच्या एका गरीब कुटुंबातील मुलगी. महेश्वर ही प्राचीन काळी सहस्रार्जुन किंवा कार्तवीर्य अर्जुन या हैहय राजाची राजधानी होती. आधुनिक काळातही महेश्वर होळकर राजांची राजधानी बनली. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या वास्तव्याने पुनित झालेली ही नगरी. नर्मदा परिक्रमा करणारे अनेक भाविक सर्वप्रथम लहान वयाच्या कन्येचे, कुमारीचे नर्मदास्वरूप मानून पूजन करीत असतात. अशा या नर्मदातीरावरील गावातून आलेली ही कन्या कुंभमेळ्यात सोशल मीडियाच्या प्रभावाने रातोरात जगप्रसिद्ध बनली. मोनालिसाच्या कुटुंबाची गावात थोडीशी जमीन आहे. उदरनिर्वाहासाठी हे कुटुंब समाजातील अन्य लोकांसह रुद्राक्ष, स्फटिकांच्या मण्यांच्या माळा विकण्याचे काम करते. अन्य ५० लोकांच्या समूहासह मोनालिसाही आपल्या पालक व बहिणींसह कुंभमेळ्यात माळा विकण्यासाठी आली.

अतिशय बोलक्या डोळ्यांच्या या सुंदर मुलीकडे लक्ष वेधले जाऊन अनेकांनी तिचे व्हिडीओ बनवले. हे व्हिडीओ व्हायरल झाले आणि तिला पाहण्यासाठी, तिच्यासमवेत सेल्फी टिपण्यासाठी, व्हिडीओ बनवून सोशल मीडियात शेअर करण्यासाठी तसेच या माध्यमातून कमाई करण्यासाठी अनेकांची झुंबड उडाली. एका चित्रपट निर्मात्याने तर तिला चित्रपटात घेण्याबाबतही सूतोवाच केले आहे. ही अल्लड मुलगी सर्वांशी हसतखेळत बोलत असे व त्याचा लाभ घेत तिचे अनेक व्हिडिओ बनवण्यात आले. तिच्यापूर्वी 'कुंभमेळ्यातील सुंदर साध्वी' म्हणून हर्षा रिछारिया नावाच्या अँकर, ट्रॅव्हलर ब्लॉगरचे फोटो, व्हिडीओ सोशल मीडियात व्हायरल झाले होते. साधक बनून गांभीर्याने काही साधना करण्यासाठी कुंभमेळ्यात आलेल्या या महिलेलाही हौशा-नवशांच्या अशा कारनाम्यांमुळे अखेर अत्यंत जड अंतःकरणाने अश्रू ढाळत कुंभमेळा सोडून जावे लागले होते. आता मोनालिसाचीही कुंभमेळ्यात अशीच स्थिती


# आपले संविधान

आपले संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी लिहून तयार झाले. यावर्षी या पूर्तता सोहळ्याची पंचाहत्तरी पूर्ण झाली. पुढच्या वर्षी २६ जानेवारी १९५० ला संविधानाची अंमलबजावणी होऊन ७५ वर्षांचा काळ पूर्ण होईल. या अमृत महोत्सवी वर्षामध्ये जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राची सर्वात मोठी लिखित राज्यघटना अमलात आल्यामुळे या ७५ वर्षांच्या कालखंडाचे सिंहावलोकन करणे आणि लोकशाहीच्या मार्गदर्शक पत्रिकेची फलनिष्पत्ती काय, याचा विचार करणे गरजेचे ठरते.

भारतासारख्या विशाल, खंडप्राय देशात लोकशाहीची तत्त्वे रुजतील, याबद्दल ब्रिटिश राजवटीतील काही तथाकथित विद्वान सत्ताधीश साशंक होते आणि हाच मुद्दा रेटत भारताला सध्या स्वातंत्र्य देणे कसे चुकीच होईल, याचा प्रतिवाद करीत होते. त्यामध्ये काहीअंशी तथ्य आहे, असा समज होण्याचे कारण म्हणजे, भारताची तत्कालीन समाजव्यवस्था. त्यावेळी देशात मोठ्या प्रमाणात अशिक्षित वर्ग होता. ब्रिटिश राजवटीने केलेल्या लुटीमुळे आलेल्या दारिद्र्यामुळे देशाची सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती म्हणावी तशी सबल नव्हती; पण देशातील समाज धुरिणांनी स्वातंत्र्याच्या पेटवलेल्या मशालीचा भडका उडून स्वातंत्र्याप्रति भारतीय मानसिकता अधिक आक्रमक झाली होती. त्यामुळे ब्रिटिशांना काहीशा नाईलाजाने का होईना भारताला स्वातंत्र्य देणे भाग पडले. आता अशा सामाजिक परिस्थितीमध्ये देशाचा गाडा हाकण्यासाठी येथील समाजाला पचेल, रुचेल असे संविधान तयार करणे याचे मोठे आव्हान त्यावेळच्या समाजधुरीनांसमोर होते आणि त्यामधूनच या महान राज्यघटनेची बांधणी झाली.

जगातली सर्वात मोठी लिखित राज्यघटना असलेले आपले संविधान, हे अंशतः लवचिक व अंशतः ताठर स्वरूपाचे आहे. कालपरत्वे बदलणारी परिस्थिती विचारात घेऊन संविधानात त्याप्रमाणे बदल करून ते अधिकाधिक परिपक्व व्हावे, असा मानस घटनाकारांचा होता. त्याचेच हे प्रतीक. गेल्या ७५ वर्षांत सुमारे १०५ वेळा संविधानामध्ये विविध बदल केले गेले. काही वेळा सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलेल्या कायदेशीर बाबींमुळे, तर काही वेळेला त्या त्या वेळच्या सत्ताधार्यांनी सुचविलेल्या बदलामुळे. संविधानाचे मुख्य भाग असलेले विधिमंडळ, न्यायपालिका आणि कार्यकारी संस्थांचा परस्पर संबंधांचा चपलख वापर घटनाकर्त्यांनी संविधानाची बांधणी करताना केल्याचे दिसून येते. त्यामुळे संविधानाच्या तत्त्वानुसारच देशाचा कारभार चालेल, त्यामध्ये राज्यकर्त्यांची किंवा प्रशासकीय कारभार किंवा न्यायपालिकेचा वरचष्मा होणार नाही आणि त्यामुळे सामान्य जनतेच्या हितास बाधा पोहोचणार नाही, याची सुंदर तजवीज संविधानात केल्याचेही दिसून येते. केशवानंद भारती, गोलकनाथ, मिनर्वा यासारख्या घटनात्मक पेचप्रसंग उद्भवलेल्या प्रकरणांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने न्यायपालिकेचे महत्त्व अधोरेखित करून राज्यकर्ते, प्रशासन आणि न्यायपालिका यांचा घटनेला अभिप्रेत असलेला समतोल सांभाळलेला आहे. संसदेला किंवा राजकर्त्यांना राज्यघटनेच्या मूल ढाचा किंवा घटनाकारांना अपेक्षित असलेले राज्यघटनेमागच्या तत्त्वास छेद जाईल अशा प्रकारची कोणतीही कृती करता येणार नाही, असा एक प्रकारचा इशाराच न्यायपालिकेने अशा काही प्रकरणांमध्ये दिला असून ते एका समृद्ध लोकशाही राष्ट्राचे प्रतीक असल्याचे त्यावरून स्पष्ट होते.

संविधानाची उभारणी करताना देशाच्या विविध प्रांतांतून सामाजिक, राजकीय आणि कायद्याची जाण असणार्या २८४ सदस्यांची नियुक्ती संविधान सभेसाठी केली होती आणि या सर्व सदस्यांनी २ वर्षे ११ महिने आणि १८ दिवस एवढ्या प्रदीर्घ काळ बौद्धिक क्षमतेची कसोटी लावून या संविधानाची निर्मिती केली आहे. हे करत असताना घटनाकारांनी जगातील अनेक प्रगत राष्ट्रांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून त्यातील काही देशांच्या राज्यघटनेमधील महत्त्वाची तत्वे स्वीकृत करून त्याचा समावेश आपल्या संविधानात केल्याचे सांगण्यात येते. घटनेचा सरनामा हा संपूर्ण संविधानाचा आत्मा आहे, असे घटनेचे शिल्पकार भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही चतु:सूत्रीचा म्हणजे संविधानाच्या सरनाम्याचे चार मुख्य आधारस्तंभ आहेत. खरे पाहायला गेले, तर आपल्या देशाला फार मोठी हजारो वर्षांपूर्वीपासूनची परंपरा आहे आणि या परंपरेमध्ये या चारही उच्च जीवनमूल्यांचा उल्लेख अगदी प्राचीन काळापासून आढळतो. भारतवर्षामधील वैशाली हे राज्य हजारो वर्षांपूर्वीचे लोकशाही गणराज्य म्हणून गणले गेले आहे.




यावरून लोकशाहीची पाळेमुळे भारत देशात फार प्राचीन काळापासून रुजली आहेत, हे स्पष्ट होते.

स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ही गुणत्रयी फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला दिली, असे सांगितले जात असले, तरी ही उच्च जीवनमूल्ये भारताच्या प्राचीन परंपरापासून देशात प्रचलित असल्याचे इतिहासातून दिसून येते. रामायणात एका सामान्य नागरिकाने सीतामातेबद्दल केलेल्या कुजबुजीतून सीतामाईला अग्निपरीक्षा द्यावी लागली. एका राजाने जनभावनेला दिलेला प्रतिसाद हे जनभावनेला अत्त्युच महत्त्व देण्याचे एक मोठे उदाहरण आहे. गौतम बुद्धांनी दिलेल्या पंचशील तत्त्वांमध्ये या गुणत्रयीचे गमक लपलेले दिसते. छत्रपती शिवाजी महाराज ते राजर्षी शाहू महाराजांच्या कार्यकाळात, स्वराज्यात स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या उच्च जीवनमूल्यांना राजाश्रय होता आणि सर्वसामान्य जनता राजाच्या कारभारावर खूश होती. प्राचीन काळातील अनेक संस्थानांत मंत्रिमंडळाची संकल्पना अस्तित्वात होती. अकबर बादशहाच्या राजदरबारात तज्ज्ञ मंत्र्यांच्या सल्ल्याने कारभार चालत असे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील अष्टप्रधान मंडळाचा कारभार प्रसिद्ध आहे. त्यामुळे भारतामध्ये अतिप्राचीन काळापासून लोकशाहीची आणि गणराज्याची संकल्पना रुजलेली असल्याचे दिसून येते.

# संध्याकाळच्या जेवणात तोंडी लावण्यासाठी सोप्या पद्धतीमध्ये घरी बनवा चविष्ट अंजीर चटणी



आपल्यातील अनेकांना अंजीर खायला आवडत नाही. अशावेळी तुम्ही सोप्या पद्धतीमध्ये अंजीर चटणी बनवू शकता. अंजीरपासून इतर वेगवेगळे पदार्थ तुम्ही बनवू शकता. चला तर जाणून घेऊया अंजीर चटणी बनवण्याची सोपी रेसिपी.

संध्याकाळच्या जेवणात नेहमीच भाजी काय बनवावं? असा प्रश्न महिलांना पडतो. नेहमीच आहारात कडधान्य खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही वेगळा पदार्थ खाण्याची इच्छा सगळ्यांचं होते. अशावेळी तुम्ही संध्याकाळच्या जेवणात तोंडी लावण्यासाठी अंजीर चटणी बनवू शकता. थंडीच्या दिवसांमध्ये बाजारात ओले अंजीर मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असतात. अंजीर खाणे आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक आहे. यामध्ये फायबर,विटामिन ए, विटामिन सी, विटामिन के आणि विटामिन ६ इत्यादी घटक आढळून येतात. याशिवाय कॅल्शियम, मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि लोह इत्यादी गुणधर्म आढळून येतात. तसेच यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे अँटीऑक्सिडंट्स शरीराचा मुक्त रॅडिकल्सपासून बचाव करतात. काहींना ओले अंजीर खायला आवडत नाही. अशावेळी तुम्ही सोप्या पद्धतीमध्ये हा पदार्थ बनवू शकता. चपाती, भाकरीसोबत ही चटणी अतिशय सुंदर लागते.(फोटो सौजन्य – )

साहित्य:

ओले अंजीर

मीठ

पुदिन्याची पान

हिरव्या मिरच्या

लसूण

कढीपत्ता

कृती:


अंजीर चटणी बनवण्यासाठी सर्वप्रथम, ओले अंजीर स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर त्याचे तुकडे करा.


मिक्सरच्या भांड्यात अंजीरचे तुकडे, हिरव्या मिरच्या, चवीनुसार मीठ, लसूण आणि कढीपत्त्याची पाने टाकून बारीक वाटून घ्या.

नंतर त्यात मूठभर पुदिन्याची पाने आणि कोथिंबीर टाकून पुन्हा एकदा बारीक वाटा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली अंजीरची चटणी. ही चटणी तुम्ही बाहेर फिरायला जाताना किंवा इतर वेळी घरात खाण्यासाठी बनवू शकता.

# महाकुंभात स्नान केल्याने प्रत्येक कर्मापासून मुक्ती मिळते? कुंभात जाणे का महत्त्वाचे आहे? सद्गुरूंनी सांगितले कारण





चरहरज्ञीलह २०२५: सद्गुरूंचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर फार व्हायरल होत आहे. यात त्यांनी महाकुंभातील स्नानाचे महत्त्व समजावून सांगितले आहे. कुंभात जाणून स्नान केल्याने काय होते ते जाणून घ्या.

प्रयागराजमधील महाकुंभ सोहळ्याला आता सुरुवात झाली आहे. हिंदू धर्मातील लोकांची महाकुंभमेळ्यावर विशेष श्रद्धा आहे. दर १२ वर्षांनी कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते, ज्यामध्ये लाखो आणि करोडो भाविक दर्शनासाठी येतात. कुंभात स्नान करण्याबरोबरच भक्त कठोर तपश्चर्याही करतात. माहितीसाठी, आम्ही तुम्हाला सांगतो की, २०२५ मध्ये उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये महाकुंभ आयोजित केला जात आहे, जो १३ जानेवारीपासून सुरू झाला आहे.

मेळ्याचा शेवटचा दिवस २६ फेब्रुवारी २०२५ आहे. असे मानले जाते की कुंभमेळ्यात स्नान केल्याने माणसाची सर्व पापे धुतली जातात आणि मोक्ष मिळण्याची शक्यताही वाढते. दरम्यान, प्रबुद्ध योगी सद्गुरूंचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये ते महाकुंभमध्ये स्नान करण्याचे महत्त्व सांगितले आहे. कुंभमध्ये स्नान केल्याने सर्व कर्मातून सुटका मिळते अशी लोकांची श्रद्धा आहे. सद्गुरूंनी याविषयीही व्हिडिओमध्ये भाष्य केले आहे.

पाण्यात डुबकी लावल्याने पाप मुक्त होता येते?

सद्गुरु म्हणतात की, प्रत्येक भारतीयाने एकदा तरी महाकुंभाला भेट द्यायला हवी. ते म्हणाले, सुमारे १४४ वर्षांनंतर सूर्य आणि गुरूच्या संक्रमणासोबत असा अद्भुत योगायोग पाहायला मिळत आहे. त्यामुळे उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे महाकुंभमेळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने एकदा तरी महाकुंभाला अवश्य भेट द्यावी. यानंतर ते म्हणतात, कुंभात स्नान केले म्हणजे तुम्ही तुमची सर्व कर्मे धुतली असा होत नाही. एक दिवस कुंभात जाऊन स्नान केल्याने पाप धुतले जात नाही.

पूजा–पाठ करा

सद्गुरु म्हणतात की, प्रत्येक व्यक्तीने कुंभात काही काळ राहावे. महाकुंभ एकूण ४८ दिवस चालणार असून, त्यादरम्यान ६ शाही स्नान होणार आहे. जर तुम्ही काही दिवस कुंभात जाऊन पूजा केली आणि संगमात स्नान केले तर तुम्हाला त्याचा खूप फायदा होईल. ते पुढे म्हणाले, मानवी शरीरात जवळपास दोन तृतीयांश पाणी भरलेले असते, महाकुंभाच्या वेळी संगमात स्नान केल्यास शरीरालाही खूप फायदे होतात.

महाकुंभातील अमृत स्नानाचे महत्त्व

जर तुम्ही अजून आंघोळीला जाऊ शकला नसेल, तर आम्ही तुम्हाला सांगतो की २६ फेब्रुवारीपर्यंत संधी आहे, तुम्ही या दरम्यान कधीतरी अंघोळीसाठी जाऊ शकता. पण अमृतस्नानाचे महत्त्व काही औरच आहे, होय, महाकुंभातील शाही स्नानासाठी लोकांची सर्वाधिक गर्दी पाहायला मिळते. तिसरे शाही स्नान २९ जानेवारीला होणार आहे. तुम्हाला तिथे जाता येत नसेल तर तुम्ही ३ फेब्रुवारीलाही जाऊ शकता.

हे अमृतस्नान बसंत पंचमीच्या दिवशी केले जाईल. बसंत पंचमी हा सण देवी सरस्वतीला समर्पित आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की, यावर्षी ३ फेब्रुवारी रोजी बसंत पंचमी साजरी केली जाणार आहे, या दिवशी महाकुंभातील शेवटचे अमृत स्नान केले जाईल. पहिला अमृतस्नान १३ जानेवारीला आणि दुसरा अमृतस्नान मकर संक्रांती म्हणजेच १४ जानेवारी २०२५ रोजी झाला.

स्नानानंतर या दोन मंदिरांना भेट द्या

महाकुंभात शाही स्नान आणि दान केल्यानंतर बडे हनुमान आणि नागवसुकीच्या दर्शनाला नक्की भेट द्यायला हवी. शाही स्नानानंतर या दोन्हीपैकी कोणत्याही एका मंदिरात गेल्यास महाकुंभाचा धार्मिक प्रवास अपूर्ण मानला जातो, अशी मान्यता आहे.

# दाट आणि काळ्याभोर केसांसाठी 'या' पद्धतीने करा आवळ्याचा वापर, काही दिवसांमध्ये दिसेल केसांमध्ये फरक



दैनंदिन आहारात आवळ्याच्या रसाचे सेवन केल्यामुळे आरोग्याला अनेक फायदे होतात. आवळ्यामध्ये असलेले गुणधर्म त्वचा, केस आणि आरोग्य सुधारण्यासाठी मदत करतात. चला तर जाणून घेऊया कशा पद्धतीने करावे आवळ्याचे सेवन.

केसांच्या घनदाट आणि लांबलचक वाढीसाठी महिला सतत काहींना काही उपाय करत असतात. मात्र तरीसुद्धा केसांची वाढ होत नाही. केसांच्या वाढीसाठी आहारात पोषक घटकांचे सेवन करणे आवश्यक आहे. आहारात विटामिन सी, फायबर, कॅल्शियम इत्यादी घटकांनी समृद्ध असलेल्या पालेभाज्या, फळभाज्या इत्यादी पदार्थांचे सेवन केल्यास आरोग्यासह केसांनासुद्धा अनेक फायदे होतील. थंडीच्या दिवसांमध्ये केस कोरडे आणि रुक्ष दिसू लागतात. केसांची कितीही काळजी घेतली तरीसुद्धा केसांवर हवी तशी चमक येत नाही. केसांच्या चमकदार आणि निरोगी वाढीसाठी अनेक महिला बाजारात उपलब्ध असलेले केमिकल युक्त तेलांचा किंवा शॅम्पूचा वापर करतात. मात्र असे केल्यामुळे केसांची गुणवत्ता अधिक खराब होऊन जाते. केमिकल प्रॉडक्टचा वापर केल्यामुळे केस तुटणे, केस गळणे, कोंडा होणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. या सर्व समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी घरगुती पदार्थांचा वापर करावा.(फोटो सौजन्य – )

थंडीच्या दिवसांमध्ये बाजारात मोठ्या प्रमाणावर आवळे उपलब्ध असतात. आवळ्याचे सेवन केल्यामुळे आरोग्यासह त्वचेला अनेक फायदे होतात. आवळ्यांमध्ये विटामिन सी, इतर पोषक घटक आढळून येतात, जे आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहेत. आवळ्याचा वापर आरोग्य, केस आणि त्वचेसाठी केला जातो. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला केसांच्या वाढीसाठी आवळ्याचा वापर कसा करावा, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. या पद्धतीने आवळ्याचा वापर केल्यास केसांची वाढ चांगली होईल.

केसांच्या वाढीसाठी या पद्धतीने करा आवळ्याचा वापर?

दैनंदिन आहारात आवळ्याचे योग्य पद्धतीने सेवन केल्यास आरोग्यासह त्वचा आणि केसांना अनेक फायदे होतील. आवळ्याच्या वापरामुळे केस गळती थांबून नवीन केस येण्यास मदत होईल. यासाठी आवळ्याच्या रस तुम्ही घरच्या घरी बनवू शकता. सर्वच ऋतूंमध्ये बाजारात आवळे उपलब्ध होतात. त्यामुळे विकत मिळणारा आवळ्याचा रस आणण्यापेक्षा तुम्ही घरी सोप्या पद्धतीमध्ये आवळ्याचा रस बनवू शकता.

आवळ्याचा रस बनवण्यासाठी सर्वप्रथम, एक किंवा दोन आवळे स्वच्छ धुवून बारीक कापून घ्या. त्यानंतर कढीपत्त्याची पाने आणि आल्याचा बारीक तुकडा मिक्सरच्या भांड्यात घेऊन त्यात थोडेसे पाणी टाकून बारीक वाटून घ्या. अशापद्धतीने तुम्ही घरच्या घरी सोप्या पद्धतीमध्ये आवळ्याचा ज्युस बनवू शकता. यामुळे उपाशी पोटी किंवा इतर वेळी तुम्ही या पद्धतीने आवळ्याचा रस तयार करून सेवन करू शकता.

नेहमी नेहमी आवळ्याचा रस बनवणे शक्य होत नसल्यास तुम्ही या पद्धतीने घरच्या घरी आवळ्याचा रस स्टोर करू शकता. यासाठी तयार केलेला आवळ्याचा रस बर्फाच्या ट्रेमध्ये ठेवून फ्रिजमध्ये ठेवा. फ्रिजमध्ये त्याचे आईस क्यूब तयार होते. सकाळी किंवा इतर वेळी आवळ्याचा रस पिण्याची इच्छा झाल्यास तुम्ही कोमट पाण्यात आवळ्याचे क्यूब टाकून पिऊ शकता.

त्वचा आणि केसांना होणारे फायदे:

आवळ्याच्या रसाचे नियमित सेवन केल्यास केसांसह त्वचेलासुद्धा अनेक फायदे होतील. त्वचेवर आलेले मुरूम, पिंपल्स, पिगमेंटेशन घालवण्यासाठी तुम्ही आवळ्याच्या रसाचे सेवन करू शकता. आवळ्याचा रस प्यायल्यामुळे केसांची वाढ झपाट्याने होते आणि केसांना अनेक फायदे होतात. शरीरातील हाडांच्या निरोगी आरोग्यासाठी आहारात आवळ्याच्या रसाचे सेवन करावे.

टीप – हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच योग्य बदलानुसार वापर करावा.

# तणाव व्यवस्थापनातही बॅरिएट्रीक शस्त्रक्रियेचा होतोय फायदा, जाणून घ्या सविस्तर माहिती

उत्सवाचा काळ संपल्यानंतर त्यांच्या मनात अपराधीपणाची भावना निर्माण होते, ज्यामुळे त्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. त्यांचे प्रयत्न व्यर्थ गेले याचे त्यांना सतत वाईट वाटते.

लठ्ठपणासारख्या आजाराने ग्रासलेल्या रुग्णांसाठी सुट्ट्यांमधील कालावधी बऱ्याचदा ताणपुर्ण आणि नैराश्याय कारणीभूत ठरतो. सण आणि उत्सव हे पदार्थांची रेलचेल, विशेषतः मिठाई आणि बेकरी उत्पादनांचा यामध्ये समावेश असतो ज्यांना नाही म्हणने कठीण असते. उत्सवाच्या मेजवानीत सामील होणे, उत्सवांमध्ये विविध पदार्थ चाखणे यामुळे तोंडावर ताबा ठेवणे कठीण होत. लठ्ठपणाचा सामना करणाऱ्या व्यक्तींसाठी ही मेजवानी वजन वाढीस कारणीभूत ठरू शकते आणि वजन कमी करण्यासाठी त्यांनी जे काही परिश्रम केले ते देखील वाया जातात. बॅरिएट्रिक आणि लॅपरोस्कोपिक सर्जन डॉ अपर्णा गोविल भास्कर यांनी मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी बॅरिएट्रीक शस्त्रक्रियेचा कसा फायदा होतो, यावर सविस्तर माहिती दिली आहे. चला तर जाणून घेऊया.(फोटो सौजन्य –

कालांतराने त्यांच्यामध्ये मानसिक ताण वाढतो. आपल्या जिभेवर ताबा न ठेवता आल्याने नैराश्याची भावना मनात निर्माण होऊ लागते. अनेकांना असे वाटते की त्यानी कष्टाने कमी केलेले वजन अवघ्या काही दिवसांतच वाढले आणि त्यामुळे त्यांना अपयशाची भावना निर्माण होते. समाजाकडून असलेल्या अपेक्षा आणि वैयक्तिक आरोग्य अशा अंतर्गत संघर्षांशी सतत झुंजत त्यांना वर्तमानातील उत्सवाचा आनंद पुरेपुर उपभोगता न आल्याने तणाव आणखीन वाढू लागतो. कालांतराने, ताणतणाव, अपयश आणि पश्चात्तापाचे हे चक्र त्यांमधील सकारात्मकता कमी करू शकते.

मेक्सिकोमधील आघाडीचे बॅरिएट्रिक क्लिनिक रीन्यू बॅरिएट्रिक्सने केलेल्या सर्वेक्षणातून असे दिसून आले आहे की, बॅरिएट्रिक शस्त्रक्रिया ही गंभीर लठ्ठपणा असलेल्या रुग्णांना सुट्टीच्या दिवसात अनेक आव्हानांना, विशेषतः आहार आणि वजन व्यवस्थापनाशी संबंधित आव्हानांना तोंड द्यावे लागते. सर्वेक्षणानुसार, बॅरिएट्रिक शस्त्रक्रियेनंतर ५० % रुग्णांना शस्त्रक्रियेपूर्वीच्या तुलनेत तणाव कमी झाला, मुख्यत्वे बॅरिएट्रिक शस्त्रक्रियेमुळे भूकेवर नियंत्रण आणि खाण्याच्या सवयींमध्ये होणाऱ्या गंभीर बदलांमुळे त्यांना खाण्याचा मोह देखील आवरता आला.

बॅरिएट्रिक शस्त्रक्रियेमध्ये अशा प्रक्रियांचा समावेश आहे ज्या पचनसंस्थेत बदल करून वजन कमी करण्यास मदत करतात. हे पोटाचा आकार कमी करून किंवा शरीरातील पोषक तत्वे शोषून घेण्याच्या पद्धतीत बदल करतात, ज्यामुळे शरीराचा आकार कमी होतो, भूक कमी होते आणि खाण्याची इच्छा कमी होते. बॅरिएट्रिक शस्त्रक्रियेच्या सर्वात सामान्य प्रकारांमध्ये गॅस्ट्रिक स्लीव्ह सर्जरी (स्लीव्ह गॅस्ट्रेक्टॉमी) चा समावेश आहे, जी पोटाला त्याच्या मूळ आकाराच्या सुमारे १५ –२० % पर्यंत कमी करते आणि गॅस्ट्रिक बायपास सर्जरी (रॉक्स–एन–वाय आणि वन ॲनास्टोमोसिस), जी पचनसंस्थेच्या एका भागाला लक्ष्य करते. या प्रक्रियांमध्ये हार्मोनल बदल देखील होतात जे भूक कमी करतात आणि चयापचय आरोग्य सुधारतात. हे हार्मोनल बदल भूक लक्षणीयरीत्या कमी करतात आणि खाण्याची इच्छा कमी करतात.

ज्यामुळे रुग्णांना भूक नसताना खाण्याची इच्छा होत नाही. त्यामुळे रुग्ण भूक नसताना खाण्यास किंवा चुकीच्या आहाराचे सेवन करण्यास भाग पाडत नाहीत, ज्यामुळे लठ्ठपणाशी झुंजणाऱ्यांसाठी हे अतिशय फायदेशीर ठरते. बॅरिएट्रिक शस्त्रक्रिया केवळ वजन कमी करण्यास मदत करत नाही तर रुग्णांच्या आहाराच्या सवयींमध्ये देखील बदल घडवून आणते. यामुळे अपराधीपणाची भावना न बाळगता त्यांनाही सण–उत्सवाचा आनंद घेण्यास आणि आत्मविश्वासाने जगण्यास सक्षम करते अशी प्रतिक्रिया मुंबईतील प्रसिद्ध बॅरिएट्रिक सर्जन डॉ. अपर्णा गोविल भास्कर यांनी व्यक्त केली.

सुट्टीत वजन वाढू नये यासाठी भूक असेल तेवढेच खाणे आहारात प्रथिनांचा समावेश असणे, जंक फूडचे सेवन टाळणे आणि सणासुदींच्या मेजवानीमध्ये स्वतःच्या आरोग्यासाठी आवश्यक असे पदार्थ सोबत बाळगणे गरजेचे आहे. सर्वेक्षणाच्या अहवालानुसार जवळजवळ निम्म्या (४९%) प्रतिसादकर्त्यांनी स्वतःला आवडणाऱ्या पदार्थाची केवळ चव घेणे पसंत केले ज्यात त्यांचा स्वतःवरील आत्मविश्वास पहायला मिळाला.

प्रतिसादकर्त्यांपैकी, ६३.३ % लोकांनी शस्त्रक्रियेनंतर लक्षणीयरित्या वजन कमी झाल्याचे अनुभवले, तर ७२ % लोकांनी मूड स्विंग कमी होऊन मानसिक आरोग्यात लक्षणीय सुधारणा झाल्याचे नोंदविले. रुग्णांनी वाढलेला आत्मविश्वास, आहाराच्या व व्यायामाच्या चांगल्या सवयी आणि गंभीर आरोग्य समस्यांचा धोका कमी झाल्याचे देखील नोंदवले, ज्यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर बॅरिएट्रिक शस्त्रक्रियेचा प्रभाव दिसून येतो. बॅरिएट्रिक शस्त्रक्रियेनंतर कमी झालेली भूक आणि निरोगी आहाराच्या सवयींमुळे रुग्णांमधील तणाव कमी झाला आणि आत्मविश्वास वाढला. प्रत्येकाला उत्सवाचा आनंद लूटता आला.शेवटी, बॅरिएट्रिक शस्त्रक्रिया रुग्णांना निरोगी आहाराच्या सवयींचे पालन करण्यास मदत करते. ज्यामुळे कोणत्याही मानसिक दबावाशिवाय त्याचा जेवनाचा आनंद घेता येतो.

## भाजपाचे ज्येष्ठ नेते अ‍ॅड. रंगनाथराव कातळे यांचे दु:खद निधन; अनेकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार



रेणापूर/प्रतिनिधी :– माजी जिल्हा परिषद सदस्य प्रा अर्चना कातळे यांचे पिताश्री रेणापूर येथील राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रात भरीव काम केलेले रेणापूर सेवा सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन तथा रेणापूर ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच अँड. रंगनाथरावजी कातळे यांचेवर गुरुवारी दुपारी रेणापूर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या सोबत अनेक वर्ष काम केलेले भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते अँड. रंगनाथराव कातळे हे गेल्या काही दिवसापासून आजारी होते. गुरुवारी पहाटे चारच्या सुमारास त्यांचे दुःखद निधन झाले. रंगनाथआप्पा नावाने ते सर्वदूर परिचित होते. स्वर्गीय कातळे यांच्यावर रेणापूर येथील सार्वजनिक स्मशानभूमीत गुरुवारी दुपारी आचार्य ओमप्रकाशजी शास्त्री यांच्या वैदिक मंत्रोच्चारात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी स्व. कातळे यांचे लहान बंधू रावसाहेब कातळे यांच्यासह मुली रंजना शेंडगे, संगीता कापसे, सिंधू गाडे, मंजुषा आपेट आणि अर्चना टेंगसे यांनी अग्नी दिला.

रेणापूर येथील राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रात अँड रंगनाथराव कातळे यांनी भरीव काम केले आहे. रेणापूर सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन आणि रेणापूर ग्रामपंचायतचे उपसरपंच म्हणून अँड. रंगनाथराव कातळे काम केले असून गोरगरीब सर्वसामान्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी तत्पर असणाऱ्या रंगनाथआप्पा यांच्या कार्याची सतत सर्वसामान्यातून चर्चा होते. अंत्यविधीस गंगाखेड येथील संत जनाबाई महाविद्यालयाचे अध्यक्ष प्रा आत्माराम टेगसे, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे लातूर ग्रामीण विधानसभा अध्यक्ष भाजपा युवा नेते ऋषिकेश कराड, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची उपाध्यक्ष प्रमोद जाधव, भाजपाचे तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे, रेणापूरचे माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, वकील संघाचे श्रीकांत सूर्यवंशी यांच्यासह रेणापूर आणि परिसरातील राजकीय सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, विविध संस्थांचे आजी–माजी लोकप्रतिनिधी, भाजपाचे पदाधिकारी सर्व स्तरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# म्हातारी मेल्याचे दुख नाही पण काळ सोकावला असे म्हणण्याची वेळ रहिवाशांवर आली आहे.




भांडुप / प्रतिनिधी : – भांडुप विभागात माता रमाबाई आंबेडकर नगर ही डोंगराळ भागात डंक लाईन बाजूला खूप जुनी वस्ती आहे. त्या संपूर्ण माता रमाबाई आंबेडकर नगरात सहा सात बुद्ध विहार आहेत.त्यात भारतीय बौद्ध महासभा शाखा क्रमांक ६ आम्रपाली बुद्ध विहार एक आहे. त्या विहारांच्या समोरील व बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत बुद्ध विहाराची सुरक्षा करण्यासाठी व बुद्ध विहाराची विटंबना होऊ नये याकरिता.आम्रपाली बुद्ध विहारांच्या धम्म उपासिका महीला कमिटीने स्वखर्चाने लोखंडी जाळीचे संरक्षण कंपाऊंड बनवले होते.तेव्हा त्याला कोणी समोरा समोर कुणीच विरोध केला नाही. परंतु दहा दिवसा नंतर त्या लोखंडी जाळीच्या संरक्षण कंपाऊंडची तोडफोड स्थानिक तीनचार समाज कंठक महिलांना पुढे करून केली.त्याला राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्याचा नेत्याचा आशीर्वाद मिळाला म्हणून त्यांनी ही हिंमत केली असे बोलले जात आहे. विहारच्या जागेत त्यांना गणपती नवरात्र इतर हिंदूंचे सण उत्सव साजरे करायचे आहेत.याविरोधात पोलिस स्टेशनला रीतसर तक्रार नोंदविण्यात आली असता.पोलिसांकडून त्यावर योग्य ती कारवाई झाली नाही. त्यामुळेच स्थानीक समाज कंठक महिला व तरुणांची हिंमत वाढल्या गेली आहे.आता ते खुलेआम सर्व धम्म उपासक उपासिकांना मुलामुलींना धमकी देऊन शिवीगाळ करून मारहाण केली जात आहे. म्हणूनच म्हातारी मेल्याचे दुख नाही पण काळ सोकावला असे म्हणण्याची वेळ रहिवाशांवर आली आहे.

केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारता मंत्री माननीय रामदास आठवले साहेब यांनी पोलिस सहाय्यक आयुक्त यांना पत्र देऊन कारवाई करण्याची विनंती केली होती.गुन्हेगारांवर कडक कारवाई होत नाही म्हणून आंबेडकरी चळवळीतील सर्व पक्षीय शिष्टमंडळ वेळोवेळी वरिष्ट पोलिस निरीक्षक खंडागळे साहेब व सहाय्यक पोलीस आयुक्त मान.जितेंद्र आगरकर साहेब यांना भेटून.संबधित समाज कंटक गुन्हेगारांची जात धर्म न पाहता कडक कारवाई करण्याची मागणी करत आली आहे.समाज कटंक एकाच जाती मधील असल्यामुळे पोलिसांना ठोस निर्णय घेता येत नाही.अशी खंत पोलिस अधिकारी वर्गाने व्यक्त केली. समाजात तेढ निर्माण होणार नाही याची काळजी घेऊन रिपाई शिष्टमंडळ आणि महिला मंडळ पोलिसांकडून योग्य कारवाईची अपेक्षा करीत आहे. ती कारवाई होत नसल्यामुळे समाज कटंक महिला व तरुणांची हिमत वाढत चालली आहे. सर्व समाज एकत्र आला आणि समाज कटंक महिला व तरुणांवर जाग्यावर कारवाई केली तर कायदा हातात घेऊन गुन्हा केला. तर बाबासाहेबांची राज्य घटना आम्हाला मान्य नाही असे होईल.

ते होऊ नये म्हणूनच महिला मंडळी मोठ्या प्रमाणात रिपाई पदाधिकाऱ्या सोबत पोलिस स्टेशन वर न्याय मागण्यासाठी येतात.हे लक्षवेधी असतांना ही पोलिस कारवाई होत नाही.ही महिला वर्गाची मोठी खंत आहे,म्हणूनच म्हातारी मेल्याचे दुख नाही पण काळ सोकावला असे म्हणण्याची वेळ रहिवाशांवर आली आहे. समाज कंटक महिलांची एवढी हिंमत वाढली की त्या बुद्ध विहारात चालणारी बुद्ध वंदना बंद करण्यास सांगतात. विहाराच्या दरवाजा समोर कचरा टाकतात,दगड लावून रास्ता अडविण्याचा प्रकार करतात.याला विरोध केला म्हणून महिलांना मुलीला मारहाण करून पोलिस तक्रार करतात.पोलिसानी बॉन्ड लिहून मागितला हे प्रकरण हाता बाहेर जाऊ नये म्हणून माता रमाबाई आंबेडकर नगरचे जून रहिवाशी रिपाई जेष्ठ नेते पवनकुमार बोराडे,यांच्या माध्यमातून आंबेडकरी चळवळीतील सर्व पक्षीय शिष्टमंडळ पोलिस अधिकाऱ्यांच्या संपर्कात असतात. त्यासाठीच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले) गटाचे मुंबई प्रदेशचे अध्यक्ष मा सिद्धार्थ भाई कासारे,ईशान्य मुंबई जिल्हाध्यक्ष अजित भाऊ रणदिवे,ईशान्य मुंबई युवा जिल्हाध्यक्ष विनोद भाई जाधव,रोजगार आघाडीचे अमित तांबे,मुलुंड अध्यक्ष योगेश शीलवंत,मुलुंड कार्याध्यक्ष राजू साळवे,युवा नेते जितू जाधव,भांडुप आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते प्रा.जगन्नाथ बावा,रिपाई जेष्ठ नेते पवनकुमार बोराडे,ज्येष्ठ नेते भगवान साळवे,ईशान्य मुंबई रिपब्लिकन सेना अध्यक्ष विजय माने,ज्येष्ठ नेते शामराव रिकीबे,ज्येष्ठ नेते अरुण रुके,ज्येष्ठ साहित्यिक निर्भीड पत्रकार सागर भाऊ तायडे, भारतीय बौद्ध महासभा बौद्धाचार्य सुनील सोनताटे,महिला आघाडी नम्रताताई सुरवसे, अंजलीताई सोनताटे,सारिकाताई काकडे,शोभाताई थोरात,सरोजाताई डोंबे, सुरेखाताई प्रधान,पंचशीला ताई भांगे,ताराबाई रोकडे,बेबीताई कांबळे,बागेश्री वाघमारे,राधाताई मोटे,देवकाताई आटकर,लताताई नलवडे प्रभावती ताई कांबळे आणि महिला पदाधिकारी उपासिका मोठ्या संख्येने वेळ काढून वरिष्ट पोलिस निरीक्षक भांडुप यांना भेटण्यास उपस्थित राहिले.

## शिवजागृती महाविद्यालयात लेखन कौशल्य, सुंदर हस्ताक्षर, सुंदर स्वाक्षरी कार्यशाळा व स्पर्धा संपन्न



नळेगाव: येथील शिवजागृती महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने दि.१४ ते २८ जानेवारी २०२५ या कालावधीत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा' या उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रम संपन्न होत आहेत. दि.२३ जानेवारी २०२५ रोजी या उपक्रमांतर्गत मराठी भाषेच्या अनुषंगाने दोन सत्रात कार्यक्रम संपन्न झाला. पहिल्या सत्रात लेखन कौशल्य व सुंदर हस्ताक्षर या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली या कार्यशाळेत प्रस्तुत विषयावर प्रा.संतोष वायगावकर यांनी विस्तृत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला डॉ.लहू वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती त्यांनीही प्रस्तुत विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी अशोक पाटील व यांनी केले तर आभार रामेश्वर सावंत यांनी मानले. याच कार्यक्रमातील दुसऱ्या सत्रात विद्यार्थ्यांसाठी सुंदर हस्ताक्षर व सुंदर स्वाक्षरी स्पर्धा घेण्यात आली. हे दोन्ही सत्र यशस्वी करण्यासाठी प्रा, गोविंद आदावळे, सुहासिनी कोटंबे आणि शिवाजी शिरुरे यांनी परिश्रम घेतले.

## केज तालुक्यातील बोरगाव(बु.) हद्दीतील मांजरा नदी पात्रातील अवैध वाळू उपसा करणाऱ्या वर कारवाई करण्यात यावी–विकास शिंदे



केज/प्रतिनिधी –केज तालुक्यातील बोरगाव(बु.) हद्दीतील मांजरा नदी पात्रातील अवैध वाळू उपसा करणाऱ्या वर कारवाई करण्यात यावी अशी मागणी विकास शिंदे यांनी लेखी निवेदनाद्वारे केज तहसीलदार यांच्याकडे केली आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील बोरगाव (बु.) येथील मांजरा नदीपात्रात अवैधरित्या जेसीबी व ट्रॅक्टरच्या साह्याने वाळू उपसा होत आहे. परंडा तालुक्यातील सिद्धेश्वर लांडगे हे गावातील काही प्रमुख लोकप्रतिनिधींना हाताशी धरून २ जीसीबी व १५ ट्रॅक्टर घेऊन रात्र दिवस वाळू उपसा करत आहेत. मी त्यांना विचारणा करण्यास गेलो असता, मला धमकी देऊन सांगितले की, तू कोण विचारणारा? तू तुझ्या तालुक्याच्या तहसीलदाराला विचार मी कसा वाळू काढतो ते. मी त्यांना तहसीलचा काही आदेश असेल तर द्या म्हणालो, तर त्यांनी तू लय बोलतोस तुला कुठे मारून टाकेल याचा पत्ता पण लागू देणार नाही अशी धमकी दिली आहे. गावातील काही ग्रामस्थांनी पोलीस उपअधीक्षक कार्यालय केज यांच्याशी संपर्क केला असता. या कार्यालयाचे अधिकारी चोपने साहेब व इतर हे दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी बोरगाव (बु.) येथील वाळू उपसा सुरू असलेल्या ठिकाणी भेट दिली असता. या ठिकाणी २ जीसीबी व १२ ट्रॅक्टर आढळून आले. यावेळी आडाळा व बोरगाव ( बु.) येथील नागरिक उपस्थित होते. श्री चोपने साहेब यांनी गुत्तेदार लांडगे यांना विचारणा केली असता त्यांनी धाराशिव जिल्ह्याचे अप्पर जिल्हाधिकारी यांचा जा.क्र. २०२३/महसुली/गोख/कावी ४५५/सीआर–१ दिनांक २३ जानेवारी २०२५ चा आदेश दाखविण्यात आला. सदर आदेशात नमूद केल्याप्रमाणे मौजे बहुला व मौजे आडाळा येथील स.नं. लगतच्या नदीपात्रातून वाळू उपसा मा. तहसीलदार कळंब यांनी हद्द ठरवून दिलेल्या ठिकाणीच वाळू उपसा करण्यास सदरील आदेशात नमूद करण्यात आले असताना सदर कंत्राटदाराने तहसीलदार कळंब यांच्याकडून हद्द ठरवून न घेताच बोरगाव (बु.)ता.केज या ठिकाणच्या स.नं.१४२,१४,१४३ इत्यादी सर्व नं.च्या लगतच्या नदीपात्रातून खूप मोठे मोठे खड्डे करून अवैध वाळू उपसा केलेला आहे व सध्या सुरू आहे. सदर उपसा केलेली वाळू ही वाळू डेपो न जाता इतर ठिकाणी विकली जात आहे. तसेच बोरगाव (बु.)ता. च्या बाजूच्या नदीपात्रातून केलेल्या वाळू उपसा याचा पंचनामा करून सदरील रक्कम गुत्तेदाराकडून वसूल करण्यात यावी व सदरील वाळू उपसा तात्काळ बंद करण्यात यावा. सदर वाळू उपसा बंद न केल्यास आम्ही बोरगाव (बु.) ग्रामस्थ रितसर निवेदन देऊन तहसील कार्यालय केज येथे आमरण उपोषणास बसुत याची गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ कारवाई करण्यात यावी असे तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. या लेखी निवेदनावर विकास नवनाथ शिंदे यांची स्वाक्षरी आहे. या लेखी निवेदनाच्या प्रती तहसीलदार केज, जिल्हाधिकारी बीड, पोलीस अधीक्षक बीड, उपजिल्हाधिकारी आंबेजोगाई यांना देण्यात आल्या आहेत.

# वाळुनी चालला उभा जोंधळा, कोण राखील माझ्या भीमाचा मळा ?

मौत आमच्या समोर थयथया नाचतेय , पण आम्हाला एक होण्याची सुबुद्धी (अक्कल) कधी येणार ?
महाराष्ट्राचं लाडकं महान व्यक्तिमत्त्व , युगकवी वामनदादा कर्डक यांनी आपल्या गीतांतून प्रस्थापित समाजव्यवस्थेची लक्तरे टराटरा फाडून वेशीवर टांगली. सामाजिक अन्यायाचे वास्तविक व यथार्थ दर्शन घडवत खंत व्यक्त केली की , पाहिले ना जे कधी ते आज आम्ही पाहतो , जात असता माऊलीची लाज आम्ही पाहतो.' होय , ही भयानक परिस्थिती निर्माण झाली केवळ आणि केवळ तुमच्या आमच्यातील दुहीमुळे , फाटाफुटीमुळे , स्वतःच्या मोठेपणाच्या बिनडोक वृत्तीमुळे. खेडोपाड्यात आमचे दिवसाढवळ्या मुडदे पाडल्या जात आहे. रक्ताचे सडे पडत आहे , आया बहिणींचा आक्रोश , लेकरांच्या किंकाळ्या आकाशाला फाडत आहे , पण इथल्या मुर्दाड व्यवस्थेला पाझर फुटेना झालाय. मिशी ठेवली म्हणून आम्हाला कापल्या जाते , पाण्याच्या माठाला हात लावला म्हणून ०९ वर्षाचं कोवळं लेकरू मरेस्तोवर मारल्या जात आहे , घोड्यावरून नवरदेव नेला म्हणून आमच्या वस्त्या टार्गेट केल्या जात आहे , तर कुठे प्रियांका भोतमांगे व तिच्या आईची सुरेखा भोतमांगे यांच्या सामूहिकपणे निर्घृण हत्या होऊनही न्याय मिळत नाही , ह्या सगळ्यांना कारण आम्हीच कपाळकरंटे आहोत.आमच्या डोळ्यासमोर आमची मौत नाचतेय , पण आम्हा बिनडोकांना एक होण्याची अक्कल येईना झाली.

बाबासाहेबांनी आम्हाला गुलामीतून मुक्त केलं पण आम्ही नालायक अजूनही गुलामीतून बाहेर यायला तयार नाही , आम्हाला गुलामीच्या उकिरड्यातच लोळायची सवय झाली त्याला कोण काय करणार ? उष्ट्या पत्रावळ्या उचलण्याची सवय लागलेल्यांना काय करणार ? कोणी काही करो , आपल्याला त्याच्याशी काहीही घेणेदेणे नाही.पण आमच्यातल्या फाटाफुटीमुळे जातीयवादी लांडगे माजलेत त्याचं काय ? ही सगळी परिस्थिती बदलण्यासाठी आपल्याला स्वाभिमानी निळ्या झेंड्याखाली एक व्हावेच लागेल. वामनदादांच्याच शब्दांत सांगायचे झाले तर , नगरी, सातारी, कोकणी, मोगलाई सारी जुनी, अमरावती आणि चांदा , एकतेने येथे नांदा...'

--------------------------

भिमपँथर मा.राजेश गवळी.
९०८२८०७६३९

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE